वाणीतून व्यक्तिमत्त्व

मित्रांनो आपला एक महत्त्वाचा सण संक्रांत अगदी जवळ आला आहे. तिळगूळ घ्या आणि गोड बोला असे आपण म्हणतो. म्हणजे आपली भाषा गोड असावी. आपल्या शास्त्र कारांनी असे म्हणून ठेवले की

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् , न ब्रूयात् सत्यम् अप्रियम् । प्रियं च नानृतम् ब्रूयात् , एष धर्मः सनातनः ॥ मनुस्मृति 4.138।।

सत्य बोलावे जे प्रिय असेल. (सत्य सांगताना विनम्रता, आदर प्रेम असावे)

जे सत्य आहे पण अप्रिय आहे असे बोलू नये. (सत्य काळजीपूर्वक उघड करावे) जे असत्य आहे आणि प्रिय आहे असे सुद्धा बोलू नये.(खोटे कधीच बोलू नये) हाच सनातन धर्म आहे.

ह्या वरून श्रीमद्भगवद्गीतेतील 18 व्या अध्यायातील शेवटच्या श्लोकाची आठवण झाली.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।18.78।।

ह्या श्लोकात संजय राजा धृतराष्ट्रांना असे म्हणतात की

जेथे योगेश्वर श्रीभगवानकृष्ण आहेत, जेथे धनुर्धारी अर्जुन आहे तेथे वैभव, विजय, सामर्थ्य आणि ध्रुव नीती आहे असे माझे मत आहे. (म्हणजे कौरव युद्ध हरणार आहेत)

शब्दांची योग्य निवड आणि आपल्या मनात असणारे भाव ह्यामुळे आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे ते ऐकणाऱ्याला समजते.

परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी असे आपल्या वाणीचे चार भाग आहेत.

चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुब्राह्मणा ये मनीषिणः। गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति।

ऋग्वेद-।1-164-45।।

वाणी चे चार भाग आहेत, जे विद्वान जाणतात. ते म्हणजे परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी. यामधील तीन गुप्त असतात. तर चौथी तुरीय वाचा मनुष्य बोलतो.

आपल्या ओठांपासून स्वरयंत्रापर्यंत व्यंजने आणि स्वर यांच्या उच्चारणाच्या जागा ठरलेल्या आहेत. आपण जे बोलतो, म्हणजे जे दुसरे आपले बोलणे ऐकू शकतात, ती म्हणजे वैखरी. त्याआधीची अवस्था म्हणजे मध्यमा. ज्याला आपण पुटपुटणे किंवा जप करणे असे म्हणू शकतो. त्या आधी ची अवस्था सर्वात महत्त्वाची 'पश्यन्ति' ह्या अवस्थेत आपण शब्दांची जुळवाजुळव करतो. आपल्या मनात कर्ता कर्म क्रियापद यासंबंधीच्या कल्पना स्पष्ट असतात. आधी ग्रहण केलेल्या ज्ञानाचा वापर आपण वाक्यरचना करताना करत असतो. सर्वात महत्त्वाची अवस्था ही 'परा' अवस्था. आपल्याला बोलण्यासाठी ऊर्जा देणारी. आपल्या बोलण्याची सुरवात येथेच होते. बरेचदा अनुभव येतो, पूर्ण विषय माहीत असून सुद्धा काही वेळा बोलताना योग्य शब्द आठवत नाहीत. किंवा आधी ठरवले नसून सुद्धा एखाद्या महत्त्वाच्या मिटिंगमध्ये आपण अत्यंत प्रभावी मुद्दा बोलून जातो. हे सर्व आपल्या आत असलेल्या चैतन्यशक्ती च्या प्रभावामुळेच.

वाणीच्या या चार भागांवर स्वतंत्र लेख लिहावा लागेल.

'वाक्यपदीयम्' ह्या भर्तृहरिं च्या संस्कृत ग्रंथात याचे विस्ताराने वर्णन केले आहे. इंग्रजीत भाषा म्हणजे Language.

मूळ लॅटिन शब्द Lingua म्हणजे जीभ. जीभ हा बोलण्याचा अवयव म्हणून Language .

आता भाषा शब्द कसा आला ते पाहू.

मूळ धातू भाष् म्हणजे बोलणे, स्पष्ट करून सांगणे.

भाष् या धातु ला अच् प्रत्यय जोडला असता

पुल्लिंग भाषः

स्त्रीलिंगी भाषा

नपुसकलिंगी भाषम्

अच् प्रत्ययाचा मुख्य अर्थ 'कर्ता' (करणारा) असा होतो.

भाष् धातु मधील 'भा' ह्या धातु चा अर्थ चमकणे. (भा+ष्) 'भा 'चा अर्थ भाष् ह्या धातु मध्ये प्रतीत होणे अपेक्षित आहेच.

आता प्रश्न असा आहे की आपल्या वाणीतून काय चमकेल? आपले व्यक्तीमत्व?

म्हणजे असे म्हणता येईल की आपण जे बोलतो, जे विचार व्यक्त करतो, तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग असतो. आपले व्यक्तीमत्व आपल्या भाषेतून प्रकट होत असते. थोडक्यात आपले विचार मांडण्यासाठी आपल्याला चौफेर ज्ञान, शब्दसंपत्ती आणि ऊर्जा यांची नितांत गरज असते.

जेव्हा आपले विचार आपल्या भाषेतून स्पष्ट होतात तेव्हा आपोआपच त्याची जबाबदारी आपल्यावर असते.

तेव्हा तिळगूळ घ्या आणि गोड तर बोलाच पण भाषेचा योग्य वापर करून बोला.

इति अनघा